# WOMEN EMPOWERMENT
## (In modern Era)

*Honorary Editor*
**Prof. Shridhar G. Bhombe**
I/c Principal

*Editor*
**Dr. Nayana S. Ratnaparkhi**
(Assistant Professor, Dnyanopasak Mahavidyalaya, Jintur)

NEW MAN
PUBLICATION
www.newmanpublication.com

**ISBN: 978-93-91621-63-6**

**Title:** Women Empowerment in Modern Era
**Editor:** Dr. Nayana S. Ratnaparkhi

© Editor

**First Published:** 2022

**Edition: I**

**Published by**
Dr Kalyan Gangarde
*for* New Man Publication,
Shivram Nagar, Parbhani - 431401.
Mob. + 91 8329000732
Email: nmpublication@gmail.com
www.newmanpublication.com

**Printed at**
Snehal Printers and Book Binders,
Shivram Nagar, Parbhani – 431401
Mob. + 91 9730721393

**Typesetting**
Mohan Patil, Parbhani

**Price: Rs 550/-**

All rights reserved. No material may otherwise be copied, modified, published, or distributed without the copyright owner's prior written permission.

Academic facts, views and opinions published by the author in the book express solely the opinions of the author. The author is responsible for their content, citation of sources and the accuracy of their references. The publisher cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.

*Honorary Editor*

**Prof. Shridhar G. Bhombe**

**I/c Principal**

*Editor*

**Dr. Nayana S. Ratnaparkhi**

(Assistant Professor, Dnyanopasak Mahavidylaya, Jintur)

*Editorial Board*

**Dr. Shyam K. Gore**

**Prof. Shridhar Kolhe**

**Dr. Ravi Kawale**

**Dr. Shireeshkumar Rudrawar**

# INDEX


| Sr. No. | Author | Article/Chapter Title | P. No. |
|---|---|---|---|
| 1. | Dr. N. S. Ratnaparkhi | Concept and Types of Women Empowerment | 9 |
| 2. | Dr. Hadgekar V.V. | Social Transformation and Women in India | 18 |
| 3. | Dr. N. S. Ratnaparkhi<br>Dr. Shyam K. Gore | Different Government program And Act in India to empower women | 22 |
| 4. | Dr. Shridhar M. Kolhe | Women Entrepreneurs in India: Their Oppertunities and Challenges | 31 |
| 5. | Dr. Manisha Tyagi | Empowering Women Domestic workers At Work Place : A study | 39 |
| 6. | Dr.Kajal Bhojwani | Homepreneurs- An emerging breed of Entrepreneurs<br>(A study based on female entrepreneurs in kalyan City) | 45 |
| 7. | Dr. S.S.Rudrawar | Pionner Women in Technology | 55 |
| 8. | Dr. Mamta K. Malviya | Women Empowerment | 64 |
| 9. | Dr. N. G. Popatwar<br>Dr. Shyam K. Gore | Socio Economic Status of Fisherman women community from Latur District(MS) India | 70 |
| 10. | Dr. Prakash R.Rodiya | Women Empowerment and economic development | 77 |
| 11. | Dr. B. G. Koshedgewar | Role of Women in Covid-19 with using Technology | 81 |
| 12. | Dr. J. R. Kote | Challenges faced by women at workplace | 86 |
| 13. | N. V.Kadubal | Women Empowerment and economic development | 91 |
| 14. | Shaikh K.Shaikh M. | National committee on women education in India | 96 |
| 15. | Miss. S. N. Langote | Women Nutritional Need And Effects | 100 |
| 16. | Bhutada V.R<br>Dr.Chaudhari R.L | Role of Education In women empowerment | 110 |
| 17. | Monoj Kumar Chaudhary | Participation of Rural women in sustainable development | 114 |
| 18. | Dr. B.G.Koshidgewar | Role of social media and women self-esteem | 122 |

| | | | |
|---|---|---|---|
| 19. | Dr. Manik S.Khandare | Empowerment of Rural Women through Mango production | 125 |
| 20. | Dr.A.K.Deshmukh | Gender equality for sustainable development | 131 |
| 21. | Dr. Gajanan Chaudhari<br>Dr.Rajesh Chaudhari | Role of Rural Entrepreneurship development in Women Empowerment | 136 |
| 22. | Dr. Jyoti D. Solunke | Effect of the Pandemic on Girls Education | 143 |
| 23. | Dr. Sunita Garud | Safety of Women at Workplace | 146 |
| 24. | Dr.Archana V.Bhosle | Women Empowerment Through Mathematics | 151 |
| 25. | Miss. Farana Anjum<br>A. M. R. Shaikh | Open Talk! Why Should Shy? | 155 |
| 26. | Dr. Bhagwat Thakare | Women Empowerment | 161 |
| 27. | प्रा. डॉ. विजया दि.गाढवे | महिला सबलीकरण व भारतीय यशस्वी महिला. | 166 |
| 28. | राजेभाऊ साहेबराव इंझे | भारतातील मातृसत्ताक पद्धती | 172 |
| 29. | डॉ. प्रतिभा सुरेश जाधव | भारतीय संविधान आणि स्त्रीमुक्ती | 178 |
| 30. | बालासाहेब शि.पवार | महिला सक्षमीकरण आणि मुलभूत अधिकार | 187 |
| 31. | डॉ रेखा ल. चौधरी,<br>प्रा. वर्षा भुतडा . | बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण | 192 |
| 32. | डॉ.सौ.रायठक लिपमाला | महिलांचे अरोग्य आणि पोषण | 197 |
| 33. | डॉ विलास शे.पाटील | स्वरूप देशी स्त्रीत्वाचे | 205 |
| 34. | डॉ. विना कुलकर्णी | Role of Women in Covid-19 Pandemic | 209 |
| 35. | डॉ. सिमा बर्गट | सशक्त नारी सशक्त भारत | 212 |
| 36. | डॉ. सुजितसिंह परिहार | स्त्री विमर्श : चुनौतियाँ | 225 |

## 31

# बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण

**डॉ. रेखा ल□म□राव चौधरी**
साह्य. प्राध्यापज , वाणिज्य विभाग
वैष्णवी महाविद्यालय वडवणी,
ता. वडवणी जि. बीड.

**प्रा. भुतडा वर्षा.आर.**
साह्य. प्राध्यापक, वाणिज्य विभाग
ज ला-वाणिज्य व विज्ञा-न,
महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी.

**प्रस्तावना -** "जननी जन्मभुमिश्च स्वर्गादवि गरीयसी" आपली जन्मदात्री आई आणि आपली भारतमाता यापुढे स्वर्ग देखील तोकडा आहे, हा भारतीय जीवनाचा महामंत्र आहे. मायभूमी आणि माता यांच्याबद्दल असणाऱ्या प्रेमादरयुक्त भावना म्हणजेच आपली भारतीय स्त्री होय. वेदकालीन, पुरातणकालीन ऐतिहासिक कालापासून भारतीय स्त्रीयांना आपापली कर्तव्ये जबाबदारीने पार पाडीत. त्यांच नांव आणि कार्य अजरामर केल्याची असंख्य उदा. आहेत आणि आजही एकविसाव्या शतकात भारतीय स्त्री संपूर्ण जगभरामध्ये प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने कार्यरत असतांना दिसत आहे. भारतदेश महासत्ता बनवण्याच्या दिशेने मार्गक्रमण करण्यास सरूवात जे ल्याचे चित्र आज आपणासमोर दिसतआहे व ते म्हणजे बचत गटाच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण महिलांचा विकास, उन्नती, प्रगती होत आहे. हीच परिस्थिती संपूर्ण देशभर एक चळवळ म्हणून बनत आहे. मराठवाड्याच्या संदर्भात विचार करता असे निदर्शनास येते की, येथील महिला खऱ्या अर्थाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. स्त्रियांना स्वत:चे हक्क, स्वातंत्र्य यांची जाणिव झाली असून स्वकर्तत्वाची किमया कळण्यास सुरूवात झालेली आहे. त्याद्वारे आर्थिक स्वंयपूर्णतेच्या दिशेने होणारी महिलांची वाटचाल ही अत्यंत स्फूर्तिदायक ठरत आहे.

**स्वयंसहाय्यता बचतगट संकल्प-ना -** स्वयंसहाय्यता गटाची चळवळ महिला बचतगट, समूहगट, शेजारीगट, स्वावलंबन बचतगट, काटकसर व कर्जगट या वेगवेगळ्या संकल्पनेतून चळवळ जोरात सुरू झाली असली तरी काही महत्वांच्या व्याख्या पुढील प्रमाणे आहेत.

१. परावलंब-ाज डून स्वावलंबनाकडे, स्वावलंबनाकडून परावलंबनाकडे जाण्यासाठी स्वेच्छेने, सहमतीने सामुदायिज बचतीच्या िमित्ता-ने जे लेली वाटचाल म्हणजे स्वंयसहाय्यता बचतगट होय.' -जु सूमबाळ सराफ
२. 'एकाच वस्तीवरील, एकच सामाजिक, आर्थिक स्तरांमधील समविचारी समान गरजा असणाऱ्या १० ते २० महिलांच्या संघटनास स्वयंसहाय्यता बचतगट म्हणतात.'

महिलांच्या आर्थिक विकासाबरोबर त्यांचा सामाजिक विकास घडवून आणणे, त्यांना त्यांचे हक्क व जबाबदारीची जाणिव करून देणे, त्यांना नियोजन व निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे, त्यांच्या क्षमतेचे संवर्धन करून आर्थिक व सामाजिक क्षमता प्राप्त करण्यास सबळ बनविणे, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये त्यांना प्रतिनिधीत्व देवून भारताच्या लोकतंत्र पध्दतीमध्ये त्यांना राजसत्तेत भागीदारी देणे म्हणजे महिलांचे सक्षमीकरण होय.

**इतिहास -** बंगलादेशातील चितगांव विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्रपाठक व जगप्रसिध्द ग्रामीण बँकेचे प्रणेते डॉ. महंमद युनूस यांनी सन १९७५ साली स्वंयसहाय्यता गटाची मुहूर्तमेढ रोवली. चितगाव विद्यापीठातील जोबरा या गावातील लोकांना वर्षानुवर्षे बँकेने नाकारल्यामुळे येथील प्रत्येक व्यक्ती सावकाराच्या विळख्यात अडकली होती. त्यामुळे त्यांनी १९८३ मध्ये बांगला देश ग्रामीण बँकेची स्थापना केली. या बँकेतर्फे अविरत स्वंयसहाय्यता गटाची संकल्पना डॉ. महंमद युनूस यांनी जागतिक स्तरावर विकसीत केली. यासाठी त्यांना पुरस्कार वितरण समितीने नोबेल पुरस्कार दिला.

देशाची रिझर्व्ह बँक, नाबार्ड बँक, केंद्र व राज्य शासनाने या कामी पुढाकार घेतला. इ.स. १९९२ पासून भारतात या बचतगटाच्या कार्याला चालना मिळाली.

**स्वंयसहाय्यता बचत गटाची उद्दिष्टे -**

१. महिलांना स्वावलंबी बनविजे.
२. महिलांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय सक्षमीकरण करणे.
३. महिलांचा आत्मविश्वास वृध्दिंगत करणे.
४. महिलांचा सन्मान करणे व समाजात सन्मान मिळवून देणे.

'बचतीद्वारे महिलांचे सबलीकरण' हा शब्दप्रयोग नेहमी ऐकण्यात येतो. सबल होणे म्हणजे शक्तिमान होणे. महिला सबलीकरण ही अशी प्रक्रिया आहे. की ज्याद्वारे महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होऊन त्यांचा आर्थिक धोरणात महत्वपूर्ण सहभाग आहे. या सर्व गोष्टीचे श्रेय जाते ते शांततेसाठीचे नोबेल पुरस्कार विजेते प्रा. डॉ. महंमद युनूस यांना ज्या की छोट्या कर्जाद्वारे बांगलादेशातील अतिशय गरीब व दारिद्री महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविले.

आज बचतगटाच्या माध्यमातून स्त्री ही पुरूषप्रधान संस्कृतीच्या आणि दारिद्र्याच्या, रेट्याखाली न दबता आर्थिक स्वावलंबी झाली आहे. आर्थिक धोरणास सकारात्मक आकार तिच्यामुळे प्राप्त झाला आहे. आर्थिक सक्षमीकरण केवळ शहरीभागापुरतेच मर्यादित न राहता बचतगटाच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरणाची गंगा ग्रामीण भागातील दारिद्री स्त्रियांच्या दारात आली आहे. त्यातून नव आर्थिक धोरण अभ्यासता आले. महिलांच्या विकासासाठी विविध स्तरावरून

एकात्मिक प्रयत्न होतांना दिसत आहे. शासन स्तरावरही महिलांच्या विकासाला गती देण्यात आली आहे.

आर्थिक स्वावलंबनाच्या उद्देशाने सुरू झालेली बचत गटाची चळवळ आज लोकचळवळ झाली आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ, नाबार्ड, ग्रामविकास विभागाची स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, जलस्वराज्य प्रकल इत्यादी अंतर्गत आज अनेक बचतगट राज्यात स्थापन झाले आहेत. यामध्ये महिला बचतगटाची संख्या मोठी आहे. हे बचतगट मिळालेल्या कर्जातून विविध लघुउद्योग, व्यवसाय उभे ज रून वस्तूंची निर्मिती करतात. या बचतगटांनी तयार केलेल्या वस्तुंना केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरील बाजारपेठा देखील काबीज केल्या आहेत. त्याची फलनिष्पती अशी झाली की परकीय चलन हे नफ्याच्या माध्यमातून राज्यात येत असल्याने आर्थिक धोरणात महिलांचा वाटा वाढू लागला आहे. शासन देखील महिला बचतगटाने तयार केलेल्या वस्तुंच्या विक्रीसाठी व्यापक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत आहे. बचतगटांना जिल्हा आणि तालुका स्तरावर ज ायमस्वरूपी विक्री केंद्र उपलब्ध करून दिली जात आहेत. एवढेच नव्हे तर सर्व शिक्षण अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना जो शालेय पोषण आहार दिला जातो त्यांची जबाबदारी आज खेड्यापाड्यातील बचतगट स्वीकारत आहेत.

स्वयंसहाय्यता बचतगटाच्या माध्यमातून महिलांच्या हाती पैसा आल्यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या. त्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला. स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ लागल्या. उद्योगासाठी त्यांना प्रशिक्षण, भांडवल उभारणी, विक्री अवस्था, यंत्रसामुग्री, कच्चामाल, कर्जफेड इत्यादी गोष्टीचे मार्गदर्शन बचतगटामार्फत मिळते. त्यामुळे स्त्रियांची निर्णय क्षमता, कार्यक्षमता, व्यवस्थापन कौशल्य, रोजगार निर्मिती वाढीस लागते. गावात घराच्या बाहेर न पडणाऱ्या या महिला कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून येऊ लागल्या. अनेक छोटे-छोटे उद्योग त्यांनी सुरू केले. त्यामुळे त्यांच्या हातात पैसा आला. पैसा आल्यामुळे त्यांना प्रथम घरात महत्त्व प्राप्त झाले. घरातील निर्णय त्या घेऊ लागल्या. उदा. -मुलीचे शिक्षण; विवाह आणि गावात पण त्यांच्या शब्दाला किंमत आली. तसेच गावातील प्रश्नाविषयी त्या आपले मत मांडू लागल्या. त्या आता गांवाचे, जिल्ह्याचे नेतृत्व करू लागल्या. त्यातून त्यांच्या बाह्य जीवनाशी संपर्क वाढला. त्यामुळे त्यांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढला. तसेच ग्रामीण स्त्रियांजवळ बँकेचे पासबुक आहे. मोबाईल आहे व त्या सहजपणे त्यांची हाताळणी करीत आहेत. बँकांचे नियम माहित असल्यामुळे बँक व्यवहार त्या सक्षमपणे करतांना दिसत आहे. ग्रामीण महिलांच्या वागण्यात आता सहजता आलेली आहे, व ही सहजता त्यांच्यात बचतगटाने निर्माण केलल्या आत्मविश्वासाचा परिणाम आहे.

महिलांचा आर्थिक धोरणातील सहभाग वाढवण्यात महिला बचतगटाने महत्वाची भूमिका बजावलेली आहे. बचतगटामुळे महिलांना विनातारण कर्ज मिळू लाजले. महिला या माध्यमातून कर्ज घेऊ लागल्या. एवढेच नाही तर दरमहा बचतीच्या रूपाने काही पैसे बचतगटाकडे जमा करावे लागतात. घेतलेल्या कर्जाचे व्याज व मुद्दल बचतगटाकडे दरमहा जमा करावे लागते व हे सर्व ज ार्य महिलां-ना करावे लागते. त्यामुळे आपोआपच महिलांचा आर्थिक धोरणातील सहभाग वाढवू लागलेला आहे. बचतगटामध्ये जमा झालेला निधी बँकेत भरणा करणे, गरजू सभासदाचे कर्ज मागणी अर्ज घेजे, त्यावर बैठकीत निर्णय घेणे, चेकने कर्ज वाटप करणे, जमा खर्चाच्या नोंदी करणे, गटाचा हिशोब लिहणे इत्यादी सारख्या अनेक आर्थिक क्रिया महिलांना कराव्या लागत आहेत. म्हणजेच आर्थिक धोरण महिला राबवत आहेत. कौटुंबिक पातळीवर महिलांचा आर्थिक धोरणातील सहभाग वाढतो आहे. पुढच्या काळात महिलांच्या उत्पादन कार्यात सहभाग वाढला पाहिजे याकडे लक्ष केंद्रीत केले गेले. त्यासाठी कर्ज देऊ लागले. त्यामध्ये प्रामुख्याने सेवा उद्योग, व्यापार, उद्योगजकता निर्मिती क्षेत्रासाठी कर्ज दिले जाऊ लागले. उदा. फळ-फळावर विकणे, किराणा दुकाण चालविणे, शिलाई मशीन चालविणे या शिवाय धान्य विक्री, जाद्य पदार्थ विक्री, भांडी विक्री, दाळ निर्मिती करणे, लोंणचे, चटणी, पापड, शेवया अशा अनेक उद्योगासाठी कर्ज दिले जाऊ लागले. अनेक महिलांना बचतगटाच्या माध्यमातून शेळी पालन, गाय-म्हैस पालन, कुक्कुटपालन, इमु पालनासाठी कर्ज घेतलेले आहे व वेळेवर परत केलेले आहे. या संदर्भात प्रा. डॉ. महंमद युनूस म्हणतात की, गरीब स्त्रीयांकडे दुरदृष्टी असते आणि गरिबीतून बाहेर पडण्यासाठी ज ाबाड कष्ट करण्याची त्यांची तयारी असते. अशा निराधार व असाह्य महिलांना उपजिविका चालविण्यासाठी व्यवसाय उपलब्ध करून देऊन त्यांना स्वयंपूर्ण बनविण्याचे काम बचत गटाने ग्रामीण बँकेच्या माध्यमातून केलेले आहे.

बचतगटाच्या सहाय्याने महिला उत्पादन कार्यात सहभाग नोंदवत आहेत. यासाठी बँका पतपुरवठा करत आहेत. शासनाकडून सोयी-सवलती दिल्या जात आहेत. महिलांचा आर्थिक धोरणातील सहभाग वाढविण्यासाठी महिला आर्थिज विकास महामंडळ भरीव कार्य करत आहे. याशिवाय नाबार्डने महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण करण्यासाठी बचतगटाद्वारे भरीव आर्थिक मदत केलेली आहे.

महिलांनी उत्पादन केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी अनेक ठिकाणी प्रदर्शनाचे अयोजन केले जात आहे. त्यामध्ये वस्तूंचे स्टॉल लावले जात आहे. त्यामध्ये चांगल्या प्रकारे वस्तुंची विक्री होत आहे.

**सारांश -** थोडक्यात महिला बचतगटाच्या माध्यमातून महिलांना बँकेची ओळख होत आहे. पैशाची बचत, गुंतवणूक, नफा कळू लागला आहे. आपण स्वत: पैसा मिळू शकतो याची जाणिव होऊ लागली आहे. एवढेच नाहीतर काही महिलांनी कुटुंबाची

विस्कटलेली घडी पुन्हा बसवलेली आहे. मुला-मुलींचे शिक्षण, आरोग्यकडे आता त्या निट लक्ष देत आहेत. त्यांना कायमच उत्पादनाचे साधन बचतगटाने उपलब्ध ज रून दिले आहे. त्या पैसा कमवू शकतात व त्यावर त्यांचा हक्क आहे. त्याचे आत्मविश्वास महिला बचतगटाने महिलांना करून दिले आहे. चूल आणि मूल एवढेच कार्यक्षेत्र मानणाऱ्या महिला बँक व वेगवेगळ्या संस्था याद्वारे जगाची ओळख ज रून देऊन त्यांचा आर्थिक धोरणात सहभाग वाढविला आहे. बचत गटात काम करणाऱ्या महिलांच्या कुटुंबामध्ये कोणताही आर्थिक निर्णय घ्यायचा असेल तर ज़ुटुंबातील महिलाशी चर्चा केली जाते. अनेक बचतगट उत्पादन कार्यामध्ये उतरल्यामुळे उत्पादन व विक्री, व्यवस्थापन महिला करत आहेत. मार्केट नफा, व्यवसाय, हे शब्द न ऐकलेल्या अशिक्षित महिला बचतगटामुळे यशस्वी आर्थिक व्यवहार करत आहेत. बचतगटामुळे महिलांमध्ये नेतृत्व गुणाचा विकास झाल्या-ने आता महिला ग्रामपंचायत, ग्रामसभेत आर्थिक धोरणाबाबत बोलत आहेत, आपल्या आर्थिक हक्काची मागणी करत आहेत. याचाच अर्थ महिलांचा आता कुटुंबाप्रमाणे सार्वजनीक जिवनात शासकीय स्तरावरील आर्थिक धोरणातील सहभाग वाढलेला आहे. या धोरणात महिलांच्या मागण्यांचे प्रतिबिंब पडलेले दिसत आहे. या सर्व बाबींमुळे महिलांचा आर्थिक धोरणातील सहभाग वाढलेला आहे.

**संदर्भ ग्रंथ -**


१. जिल्हा ज्ञामीज विज ास यंत्रजा, २००६ स्वयंसहाय्यता बचतगट मार्जदर्शिज ा-बीड. माविम प्रज ाशन.
२. वैद्य मोहन वसंत, २००३ महिला बचतगट हस्तपुस्तिका पुणे, विश्व प्रकाशन.
३. रमेश बालवाड, बचतगटातून समृध्दीकडे, विद्याभारती प्रकाशन.
४. रविंद्र म. काटोळे, जून-२००६, महिला बचतगट, स्वयंसहाय्यता बचतगट मार्गदर्शिका, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे.
५. थेकेकरा टी.एफ., २००७ महिला आर्थिक विकास महामंडळ मुंबई, माविम प्रकाशन.
६. प्रा.डॉ. एम.यु. मुलाणी, २००८, अल्पबचत नियोजन, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
७. लोकराज्य, मार्च जून-२०१०.
८. योजना, जुलै-२०१०.
९. प्रा.डॉ. महमंद युनूस, डिसेंबर-२००७, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.
१०. अभिसरण विशेषांक, ऑक्टोंबर २०१०- वार्षिक अनुसंधान पत्रिका, बलभीम महाविद्यालय, बीड.


❄❄❄